# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.६६५५/२०२६

श्री. अर्जुनसिंग दिवाणसिंग वसावे
समता हौसिंग सोसायटी, बाहेरपुरा
नंदूरबार, जिल्हा-नंदूरबार.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (का.10),
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (का.10),
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०८.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१२.२०२२ | ०३.०२.२०२३ | १३.०२.२०२३ | ०३.०३.२०२३ |

अपिलार्थींनी दाखल केलेल्या दिनांक ३०.१२.२०२२ रोजी च्या जोडपत्रानुसार धनगर समाजाद्वारे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स यांना सादर केलेल्या अहवालाची छायांकित प्रत मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विचारणा केलेल्या माहिती बाबतच्या नस्तीवर सद्य:स्थितीत शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून माहिती उपलब्ध करून देता येणे शक्य नसल्याचे सुचित केले. त्यावर अपिलार्थींनी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर धनगर समाजास अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबत विविध संघटनांकडून मागणी होत असून त्या अनुषंगाने याबाबतचा अभ्यास अहवाल सादर करण्याबाबत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेस निर्देश देण्यात आले. सदर संस्थेने अहवाल सादर केला असला तरी त्याबाबत शासन स्तरावर कुठलाही निर्णय झाला नसल्याने तसेच वरील अहवाल हा शासनाच्या अंतिम विचाराधीन असून **कलम ८ (झ)** च्या तरतुदीनुसार हा अहवाल अपिलार्थींना शासन स्तरावर अंतिम निर्णय होईपर्यंत देता येणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे. त्याविरुद्ध अपिलार्थींनी उपरोक्त द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हजर नसून आदिवासी विकास विभाग, मंत्रालय येथील विद्यमान कक्ष अधिकारी व विद्यमान अपिलीय अधिकारी व्यक्तिशः हजर आहेत. तसेच त्यांनी याआधी घेतलेल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला असून प्रस्तुत प्रकरण हे शासनाच्या विचाराधीन असून याबाबतीत अंतिम निर्णय झाला नसल्याने **कलम ८ (झ)** मधील तरतुदीनुसार मंत्री परिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर तो निर्णय घेण्यात आला होता ती सामग्रीही निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यानंतर, समाप्त झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल. तसेच यात मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आलेली कागदपत्रे तसेच मंत्री परिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचार विमर्शाचा अभिलेख याचाही समावेश केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद हा नकारात्मक नसून धोरणात्मक बाबींवर शासनास सादर करण्यात आलेल्या अहवालावर अद्याप अंतिम मंजुरी प्राप्त झाली नसल्याने तो उपलब्ध करून देता येणार नाही ही वस्तुनिष्ठ भूमिका मांडण्यात आली असल्याचे आढळून येते. तसेच उपरोक्त प्रश्नावर शासन स्तरावर अंतिम निर्णय झाल्यावर वरील अहवाल हा सर्वच नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे शक्य आहे. सद्य:स्थितीत या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून अंतिम निर्णय अद्यापही झाला नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र.६६५५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : १०.०८.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**